**L. C. BILL No. XIII OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

**सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १३ .**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानसभेने दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;



एचबी-१३२१–१

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता; १९५९ चा ३. १९६२ चा महा. ५.

२०२५ चा महा. अध्या. १२.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

प्रकरण एक

## प्रारंभिक.

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दोन

## महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाची सुधारणा.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १०-१क ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश," महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम १०-१क मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील:- १९५९ चा ३.

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३०-१क ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३०-१क मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील:-

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सरपंच म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

प्रकरण तीन

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याची सुधारणा.**

१९६२ चा महा. ५.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १२क ची सुधारणा.

**४.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम १२क मधील, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील:-

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, परिषद सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ४२ ची सुधारणा.

**५.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम ४२ मध्ये, पोट-कलम (६क) मधील, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील:-

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, अध्यक्ष म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ६७ ची सुधारणा.

**६.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम ६७ मध्ये, पोट-कलम (७क) मधील, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील:-

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सभापती म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ याचे निरसन व व्यावृत्ती.

**७.** (१) महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२५ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२५ चा महा. अध्या. १२.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत अधिनियम, १९६१ यांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

[ सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १३.]

[ महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र
जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१
यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक. ]

[श्री. जयकुमार गोरे,
ग्रामविकास मंत्री.]

[विधानपरिषदेने दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी संमत
केल्याप्रमाणे.]

[विधानसभेने दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी संमत
केल्याप्रमाणे.]

जितेंद्र भोळे,
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.